# गोड शेवट

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**गोड शेवट : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २६०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# गोड शेवट

# अनुक्रमणिका


१. कर्जबाजारी रामराव ........ ७
२. मित्रांची जोडी ........ १२
३. कोजागिरी ........ २६
४. आपण दोघे भिकारी होऊन हिंडू ........ ४१
५. दयाराम भारतींना हद्दपारीची शिक्षा ........ ५२
६. राष्ट्रीय मेळा ........ ५९
७. जगन्नाथचे लग्न ........ ७०
८. येथे नको, दूर जाऊ ........ ८२
९. गुणा, कोठे गेला गुणा? ........ ९६
१०. आगगाडीत भेटलेला देव ........ १०५
११. दु:खी जगन्नाथ ........ ११७
१२. इंदूर ........ १२८
१३. इंदिरा ........ १४८
१४. जगन्नाथ ........ १६४
१५. इंदू ........ १८६
१६. अनुदार आहे देव ........ १९९
१७. एरंडोलला घरी ........ २१८
१८. प्रेमयात्रा ........ २२८
१९. चंद्रभागेत पवित्र हो ........ २४६
२०. शेवटी सारे गोड होते ........ २५४

# कर्जबाजारी रामराव

एरंडोल हे गाव खानदेशात सुप्रसिद्ध आहे. अति-प्राचीन असे हे गाव आहे. महाराष्ट्रात इतकी जुनी गावे क्वचितच असतील. प्राचीन काळी १५०० वर्षांपूर्वी दिग्विजयाच्या समुद्रगुप्ताने 'महाराष्टात' की एरंडपल्ली जिंकले. असे आपल्या विजयस्तंभावरील दिग्विजयाच्या यादीत लिहिले आहे. एरंडोलला पांडवांचा वाडा अद्याप दाखवतात. आज त्यात मशीद आहे. ज्या एकचक्रानगरीत पांडव भिक्षेकऱ्यांच्या रूपाने एका ब्राह्मणाकडे राहत, ती नगरी एरंडोलच्या जवळच होती असे सांगतात आणि एरंडोलपासून चार-पाच मैलांवर पद्यालय म्हणून निसर्गसुंदर स्थान आहे. तेथे जंगलात बकासुर राहात असे. तेथेच भीमाने बकासुराला मारले. तेथे पांढरे ठिपके असलेले दगड आहेत. लोक म्हणतात की, हा त्या गाड्यातील दही भात आहे. तेथे दगडात खळगे आहेत. ती भीमाची व बकासुराची पावले आहेत असे म्हणतात. असे हे प्राचीन शहर आहे. मध्यकाळातही एरंडोल भरभराटीत होते.

एरंडोलला  कागदीपुरा आहे. येथील कागद नागपूरपासून कोल्हापूरपर्यंत जात असे. येथे कितीतरी कागदाचे कारखाने होते; परंतु परदेशी यांत्रिक कागद येऊ लागला व येथील हा भरभराटलेला भाग ओस पडला; परंतु महात्मा गांधीजींची

ग्रामोद्योगाची चळवळ येऊन येथील लोकांस पुन्हा कागदीपुरा गजबजू लागला आहे. कागदाला मागणी येत आहे व गरीब मुसलमान बंधूभगिनी काँग्रेसला व महात्माजींच्या ग्रामोद्योगास दुवा देत आहेत.

एरंडोलच्या भोवती जुना तट आहे. गावातील पाणी वगैरे वाहून जाण्याची पूर्वी फार सुंदर व्यवस्था होती. गावाला लागून सुंदर नदी आहे. तिचे नाव अंजनी. नदीला पूर्वी बारा महिने पाणी असे. पूर्वी पाऊस जास्त पडे. आता पाऊस कमी झाला. लोक म्हणतात की, पाप झाले म्हणून नदीचे पाणी कमी होऊ लागले. कोणी कोणी दंतकथा सांगतात की, एकदा एका ऋषीने आपली छाटी तीरावर वाळत घातली होती; परंतु एकाएकी पूर आला व छाटी वाहून गेली. ऋषी रागावला.त्याने नदीला शाप दिला, ''तू फार उन्मत आहेस. तुझे पाणी कमी होईल.'' त्या वेळेपासून पाणी पळाले; परंतु कोणी विचारवंत म्हणतात, ''लहानशा लंगोटीसाठी सर्व जगाचे पाणी बंद करणारा हा क्रोधी ऋषी त्याची का वाणी खरी होईल? या दंतकथेत अर्थ नाही. जंगले कमी होऊ लागली, त्यामुळे पाऊस कमी पडू लागला म्हणून नदीचे पाणी उन्हाळ्यात कमी राहू लागले. अलीकडे पाऊस पुन्हा अधिक पडू लागला आहे. नदीला पाणी राहू लागले. स्वच्छ सुंदर पाणी असल्याने बायकांची धुण्यासाठी गर्दी असते. दूरवरच्या बाजूस लोक स्नानास जातात मुले डुंबत असतात. गाईगुरे येत असतात. गावाला नदी असली म्हणजे गावात चैतन्य असते.

एरंडोलला जुन्या इमारती आहेत. जुन्या सुंदर मशिदी आहेत. मोठ मोठे जुने वाडे आहेत. एके काळचे शहराचे वैभव त्यावरून दिसून येते; परंतु आज ते भाग्य कोठे आहे? जुन्या वैभवाची पडकी माती फक्त आज आहे. त्यावेळचे देशमुख, देशपांडे आज गरीब झाले आहेत. एकेकाळी ज्यांच्याकडे हत्ती झुलत, त्यांना आज खाण्याची पंचाईत पडू लागली आहे. लक्ष्मी ही चंचल आहे. मनुष्याला गर्व वाटू नये म्हणून का ती एके ठिकाणी राहत नाही? परंतु लक्ष्मी चंचल नसून मनुष्यच चंचल आहे. लक्ष्मी नेहमी गुणांजवळ राहते. ज्या देशात उद्योग अधिक, संघटना अधिक, सहकार्य अधिक, बुध्दी अधिक. निश्चय अधिक, बंधुभाव अधिक त्या देशात संपत्ती राहाते. तेथे लक्ष्मी राहते. आळस व विलास आले की, लक्ष्मी पलायन करू लागते.



एरंडोलच्या आसपास कितीतरी आमराया. एरंडोलचे आंबे फार प्रसिध्द. रसाळ, गोड चवदार आंबे. एरंडोल कागदासाठी प्रसिध्द होते, आंब्यासाठी होते; परंतु न्यायासाठी सर्वात अधिक प्रसिध्द होते. एरंडोली न्याय ही म्हणच पडली आहे. एरंडोलचे लोक समतोल शांत व निश्चयी म्हणून प्रसिध्द होते. विचारपूर्वक आचार करणारे अशी ख्याती होती; परंतु एरंडोलची पूर्वीची ही ख्याती आता तितकी राहिली नव्हती.

एरंडोलची जुनी खानदानी घराणी साफ बसली होती. ती कसेतरी दिवस काढीत होती. नवीन श्रीमंतवर्ग जन्माला आला होता, पूर्वीच्या श्रीमंत घराण्यात जे कारभारी गुमास्ते म्हणून वावरत होते, तेच आज सावकार होऊन बसले होते व ज्या मालकांकडे ते नोकर होते; ते मालक आज लाचार होऊन त्यांच्याकडे कर्ज मागायला येत असत. ज्या मोठमोठ्या वाड्यांतून पूर्वी मेजवान्या झडत, संगीताचे जलसे होत, त्या वाड्यातून आता केवळ उपासमार होती. जेथे गडीमाणसे हिंडत, जेथे गाड्याघोडी असत, तेथे आज केवळ दारिद्र्य दिसून येत होते.

एरंडोल पंढरीशेट शिंपी म्हणून एक असेच नवीन सावकार होते. ते पिढीजात सावकार नव्हते. असेच उपरे सावकार. त्यांनी कोठेतरी डल्ला मारला होता. असे म्हणतात. कोणी म्हणतात की, एक मोठा दरोडेखोर डाका घालून त्यांच्याकडे लपला होता. सारी संपत्ती त्यांच्याकडे ठेवून तो गेला; परंतु तो परत आलाच नाही. ती जी संपत्ती मिळाली तीवर पंढरीशेटचे घराणे वर आले. खानदेशात बहुतेक ठिकाणी ही डाक्यांची संपत्ती आहे. चोपडे शहरात अजून खूप संपत्ती आहे म्हणतात; परंतु ही आली कोठून? खानदेशात एक जुनी म्हण आहे, ''धरणगाव में धन बडा, पारोळे में बाकी साकी: चोपडे में जावे पानी पीनेकू तो बतावे तापी.'' चोरीची संपत्ती घरात. त्यामुळे चोपड्याच्या श्रीमंतांना कोणी घरात येऊ नये असे जणू वाटे. न जाणो उघडकीस काही यायचे. खानदेशभर अशा या डाक्यातील संपत्तीच्या गोष्टी आहेत. त्यातून गावोगावचे सरकार व धनिक वर आले. पंढरीशेट श्रीमंत होते; परंतु त्यांच्या घरात खानदानीपणा नव्हता. एक प्रकारची उदार व दिलदार वृत्ती नव्हती. इतकी श्रीमंती होती तरी घरी नीट भाजी खाणार नाहीत. दरिद्र्याप्रमाणे राहतील. दूध व ताकही विकतील. खेड्यापाड्यांवरून कुळे आली तर त्यांना गुळपाणी देणार नाहीत, त्यांच्या खाण्यापिण्याची चौकशी करणार

नाहीत. पंढरीशेटजीस कोणीही 'बरे' म्हणत नसे. त्यांना कर्जदाराची कधी दया येत नसे. 'पैसा म्हणजे माझा प्राण' असे ते म्हणत.

याच एरंडोल शहरात रामराव म्हणून एक घरंदाज गृहस्थ होते. ते श्रीमंत होते; परंतु आज त्यांना वाईट दिवस आले होते. त्यांना खूपच कर्ज झाले होते. त्यांना आता नवीन कर्ज द्यावयास कोणी तयार नसे; परंतु कर्जाशिवाय तर त्यांचे पदोपदी अडे. कोणाकडे तोंड वेंगाडायचे?

रामराव यांना एकच मुलगा होता. त्याचे नाव गुणा. गुणावर त्यांचे फार प्रेम होते. तो त्यांची आशा. तोच जणू त्यांची इस्टेट. बाहेर त्यांना आता फार मान मिळत नसे. कधी कधी अपमानही होत; परंतु घरी येऊन गुणाला पाहिले की, सारे अपमान ते विसरून जात. गुणा खरोखर गुणांचा होता. दिसे सुंदर, हसे सुंदर. त्याच्या भुवया फारच सुंदर होत्या. कान लांब होते. जणू देवाची मूर्ती असा तो दिसे आणि आता गुणाची मुंज करावयाची होती. जवळ तर दिडकी नाही; परंतु नाव तर मोठे. थाटाने मुंज नको का करायला? परंतु कर्ज देणार कोण? कोणाकडे जावयाचे? शेवटी रामराव पंढरीशेटकडे गेले. पंढरीशेट म्हणाले, '' हे पाहा रामराव, आता तुम्हाला पैसे देण्यात अर्थ नाही. कोणीही शहाणा सावकार तुम्हाला आता पैही देणार नाही.''

''तुम्ही काही करा; परंतु माझी अब्रू सांभाळा. गुणाची मुंज केलीच पाहिजे. आणखी किती आता वाट पाहावयाची? परंतु नुसती लंगोटी थोडीच लावायची? मोठं नाव पडलं ना? थोडा फार खर्च करायला हवा.''

''परंतु असे कसे पैसे द्यावयाचे?''

''पंढरीशेट, माझ्याजवळ आता काय राहिलं आहे? सारी शेती गहाण पडली. घरात दागदागीना राहिला नाही. मी तुमचे पैसे परत करीन. कर्ज फेडल्याशिवाय मी मरणार नाही.''

''अहो, कसं फेडणार कर्ज? शब्दांनी का फेडता येते? तुमचं राहातं घर आहे. ते देता लिहून? काही तरी आधार हवा. आधाराशिवाय मी कसे देऊ पैसे? देता घर लिहून? बोला.''

''वडिलोपार्जित वाडा गहाण ठेवायला वाईट वाटतं''

''परंतु त्याशिवाय पैसे मिळणार नाहीत.''



रामराव निराश होऊन घरी गेले. त्यांनी आणखी काही ठिकाणी प्रयत्न केला. परंतु पैसे कोठेही मिळत ना. शेवटी रामरावांनी आपले राहते घर गहाण

ठेवले. ते लिहून दिले. अर्थात त्यांना त्या घरात राहावयास परवानगी होती. घर लिहून देताना त्यांच्या डोळ्यांत पाणी आले.

''पंढरीशेट. तुम्ही शेवटी मला रडवलंत!''

''रामराव, हा व्यवहार आहे. तुम्ही जे पैसे नेणार त्याची फेड होणं शक्य आहे का? तुम्हाला तरी तसे वाटते का? तुमच्याजवळ काहीही उरलेलं नाही असं तुम्हीच म्हणता. फुकट पैसे देण्याइतका मी उदार नाही.''

रामराव पैसे घेऊन गेले. गुणाची त्यांनी जरा थाटाने मुंज केली. गुणा मोठा होऊ लागला. तो इंग्रजी शाळेत जाऊ लागला. तो हुशार होता. मुलगा पुढे नांव काढील असे सारे म्हणत; परंतु रामरावांना वाईट वाटे. आपल्या मुलाला शिकवण्याला त्यांच्याजवळ पैसे कोठे होते? तुमच्या गुणाला खूप शिकवा तो हुशार आहे, असे कोणी म्हटले म्हणजे त्यांना वाईट वाटे .

ते म्हणत, ''नसता हुशार तर बरं झालं असते. त्याची हुशारी वाया जाणार. त्याची बुध्दी फुकट जाणार. दरिद्री व कर्जबाजारी पित्याच्या पोटी कशाला आला?''

'' तो शिष्यवृत्ती मिळवील व अभ्यास करील. तुम्हाला काळजी नको.''लोक म्हणत.

'' परंतु आपणास मदत करता येत नाही याचं वाईट वाटणारच मला.'' रामराव दु:खाने उत्तर देत.

✦✦

# मित्रांची जोडी

गुणा मोठा होत होता. गुणाचा एक गुण रामरावांच्या लक्षात आला. गुणाला वाद्ये वाजवण्याचा नाद लागला. पंढरीशेटचा लहान मुलगा जगन्नाथ हा गुणाचा मित्र. दोघे एका वर्गात होते. जगन्नाथ व गुणा यांचे एकमेकांवर फार प्रेम. ते जवळजवळ बसत. बरोबर फिरायला जात. बरोबर नदीत डुंबत.ते एकमेकांस कधी विसंबत नसत.

जगन्नाथचा गळा फार गोड होता. देवाने त्याला गोड आवाजाची देणगी दिली होती. पंढरीशेटचा हा शेवटचा मुलगा. तो आई-बाबांचा फार लाडका होता. फार प्रेमाने त्याला वाढवण्यात आले. तो दिसेही सुरेख. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारची कोमलता होती आणि डोळे जणू प्रेमसरोवर होते. केस काळे कुळकुळीत होते आणि कधी सणावाराचे दिवशी जेव्हा तो सुंदर पोशाख करी, अलंकार घाली. तेव्हा तर त्याची मूर्ती फारच मनोहर दिसे.

''तुमच्या जगन्नाथला मधुर कंठ आहे. त्याला गाणे शिकवा ना,'' एक मित्र पंढरीशेटना म्हणाले.

''गाण्यानं मुलं बिघडतात. उद्या मोठे झाल्यावर बैठकी करतील. सारे पैसे उधळतील. कशाला हवा गोड आवाज? उद्या कठोर आवाजाची जरुरी लागेल.



कुळं खंड देत नाहीत, पैसे परत करीत नाहीत. त्यांच्यावर जरा ओरडता आलं पाहिजे. रागाने सांगता आलं पाहिजे. गोड आवाज, काय करायचा तो?'' पंढरीशेट म्हणाले.

''असं नका हो म्हणू. गायनाची कला म्हणजे दैवी कला. सर्व दु:खाचा विसर पाडणारी कला. तुम्हाला अनुकूलता आहे, म्हणून सांगितलं,'' तो मित्र म्हणाला.

पंढरीशेटनी ऐकले नाही;परंतु पुढे जगन्नाथच वडिलांच्या पाठीस लागला आणि आईकडूनही त्याने वशिला लावला. शेवटी, एक गवई जगन्नाथास शिकवू लागला. गोड आवाजाला शिक्षणाची जोड मिळाली. जगन्नाथ सुंदर गाऊ लागला.

हा जगन्नाथ गुणाचा आता मित्र झाला होता. गुणा जगन्नाथकडे जाई. गाणे ऐके. गवई शिकवत असता गुणाही बसे. तेथे हळूहळू सारी संगीत वाद्ये जमू लागली. तबला, तंबोरे आले, पेटी आली, सतार-सारंगी आली. जणू गांधर्व विद्यालय सुरू झाले.

गुणाला गाता येत नसे;परंतु त्याचे हृदय संगीताने वेडे होई. ते स्वर त्याच्या कानांत घुमत. त्यांची बोटे नाचत. जगन्नाथच्या खोलीत तो हळूच सतार हाती घेई. तारा छेडी, पडदे दाबी. आपल्याला हे सारे येईल असे त्याला वाटू लागले. तंतूवाद्याची त्याला मोहिनी पडली. आपण तंतूवाद्य शिकावे असे त्याला वाटू लागले.

एकदा एरंडोलमध्ये एक प्रख्यात सतार वाजवणारा आला. त्याचे अनेक ठिकाणी कार्यक्रम झाले. गुणा त्या सर्व कार्यक्रमास जाई. तो वेडा झाला. त्याच्या आत्म्याला संगीताची भूक लागली.

एके दिवशी तो आपल्या पित्याला म्हणाला, ''बाबा मला शिकवा ना संगीत. मला सतार-सारंगी शिकवा. त्याशिवाय मला चैन पडणार नाही. शिकवाल का बाबा?''

''बाळ,कोण शिकवणार?''

''बाबा, तो नजीरखां आला आहे ना, तो इथे वर्ग काढणार आहे. पुरेसे विद्यार्थी मिळाले पाहिजेत. मी घालू का त्या वर्गात नाव?''

''सांगेन हो उद्या.''